# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 17.03.2025** **वार- सोमवार**

---

**शेतकरीओळखपत्र**

पुणे जिल्ह्यातील साडेचार लाख शेतकऱ्यांचे ‘फार्मर आयडी’ म्हणजे शेतकरी ओळखपत्र तयार करण्यात आले असून , राज्यात 78 लाखांहून अधिक शेतकऱ्यांची ओळखपत्र तयार झाली आहेत अशी माहिती पुणे कृषी विभागानं दिली आहे. जिल्ह्यात एकंदर 14 लाख 53 हजार 297 शेतकऱ्यांची नोंद आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी ओळखपत्र बंधनकारक करण्यात आलं आहे.

**शिवजयंती**

तिथीनुसार शिवजयंती आज पुणे शहर आणि परिसरात ठीकठिकाणी साजरी करण्यात येत आहे. या निमित्तानं शिवनेरीसह विविध गड किल्ल्यांवर शिवभक्तांनी गर्दी केली आहे, अनेक संस्था संघटनांनी विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं आहे.

**सीसीटीव्ही**

पुणे पोलिसांकडून पुणे शहरात १ हजार २०० सीसीटीव्ही बसविले जाणार असून या कामासाठी ५०० किलोमीटरचे रस्ते खोदण्यात येणार आहेत. गेल्या पाच वर्षात महापालिकेची समान पाणी योजना आणि खासगी मोबाईल कंपन्यांच्या खोदाईमुळे रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झालेली होती. त्याच्या दुरुस्तीवर सुमारे ५०० कोटींचा खर्च झाल्यानंतर आता पुन्हा सीसीटीव्ही नेटवर्कसाठी ५०० किलोमीटरची खोदाई होणार आहे.

**जपानीमेंदूज्वरलसीकरण**

पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे शहरात जपानी मेंदूज्वरची प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे . ही लस पूर्णपणे सुरक्षित असून ती पूर्ण प्रशिक्षित वैद्यकीय पथकांमार्फत देण्यात येत आहे. त्यामुळे १ ते १५ वर्ष वयोगटातील सर्व लाभार्थींनी ही लस घ्यावी, असं आवाहन मुख्य आरोग्य अधिकारी डॉक्टर निना बोराडे यांनी केलं आहे.

**अवयवदान**

पुण्यातील मुंढवा इथल्या रितेश हिवाळे यांच्या मृत्यूनंतर कुटुंबीयांनी त्यांचं हृदय, मूत्रपिंड आणि डोळे दान केले आहेत.  नोबल रुग्णालयात १५ मार्च रोजी ही प्रक्रिया पार पाडली. १३ मार्च ला संध्याकाळी पायी फिरत असताना रितेश यांना भरधाव रिक्षानं धडक दिल्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. उपचारां दरम्यान डॉक्टरांनी  त्यांना मेंदूमृत घोषित केलं होतं.

**दिग्पाल**

संतांनी निर्माण करून ठेवेलेलं वाङ्मय जगायला मदत करतं म्हणून असं वाङ्मय टिकवणं ही आपली जबाबदारी असल्याचं प्रतिपादन दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी काल पुण्यात केलं. सज्जनगडच्या श्रीरामदासस्वामी संस्थान आणि पुण्यातील अक्षर रसिक सुलेखन वर्ग यांच्या वतीनं घेण्यात आलेल्या सुलेखन स्पर्धेतल्या यशस्वी विद्यार्थ्यांच्या कौतुक सोहळ्यात ते बोलत होते. सुमारे 10 हजार विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते.

**पुरस्कार**

छत्रपती श्री शिवाजी महाराजांनी घालून दिलेल्या  पायंडयानुसार पावलं टाकल्यास आयुष्य सुखकर होईल असा विश्वास अभिनेते अजय पुरकर यांनी व्यक्त केला. परभन्ना फाउंडेशनच्या वतीनं आयोजित 'सेवाकार्य कृतज्ञता पुरस्कार वितरणप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. फाउंडेशनच्या वतीनं विविध क्षेत्रातील मान्यवरांना ज्येष्ठ कृषितज्ज्ञ डॉ. बुधाजीराव मुळीक आणि पुरकर यांच्या हस्ते  पुरस्कार देण्यात आले.

**नमोज्ञानेश्वरा**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जन्मवर्षानिमित्त डॉ. रामचंद्र देखणे साहित्य-कला प्रतिष्ठानच्या वतीनं ज्ञानेश्वर महाराज यांचा जीवनपट उलगडून दाखविणाऱ्या ‘नमो ज्ञानेश्वरा’  या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं  आहे.हा कार्यक्रम येत्या 22 मार्च रोजी सकाळी 9 वाजता भरत नाट्य मंदिर इथं होणार आहे.कार्यक्रमात संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त डॉ. भावार्थ रामचंद्र देखणे विविध कथानकांद्वारे ज्ञानेश्वरांची महती विशद करणार आहेत.

**निधनविमामिरासदार**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते, आपटे उपलप प्रशालेचे माजी मुख्याध्यापक विठ्ठलराव मारुती तथा वि.मा.मिरासदार यांचं आज पंढरपूर इथं निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. संघाच्या तालुका संघचालक, जिल्हा संघचालक आणि पुणे विभाग संघचालक अशा जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या आहेत.

**काश्मीरक्रिकेट**

असीम फाऊंडेशन आणि चिनार कॉर्प्सच्या सद्भावना प्रकल्पांतर्गत काश्मीर खोऱ्यातील १५ उदयोन्मुख महिला क्रिकेटपटू सध्या पुण्यात क्रिकेट दौऱ्यासाठी आल्या आहेत. क्रीडाकौशल्याला आणि राष्ट्रीय एकात्मतेला प्रोत्साहन आणि युवा पिढीला भारताच्या सांस्कृतिक वैविध्याची ओळख करून देण्यासाठी या दौऱ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. काश्मीर-पुणे फ्रेंडशिप ट्रॉफीच्या पहिल्या सामन्यात या खेळाडूंनी चिकाटी, धाडस आणि खिलाडूवृत्ती चं प्रदर्शन केलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 38 तर किमान तापमान 18 पूर्णांक 4 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**